



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड






www.surajyadigital.com । शनिवार, दि. १२ ऑक्टोबर २०२४ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १५ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# बंडोबा रडारवर



## आखाड्यात 'गेम' करण्याचा पवारांनी आखला प्लॅन

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या डोक्यात कोणता राग बसला आहे तसेच त्यांच्या पोटात काय शिजत असते याचा अंत अजूनही कुणलाच लागलेला नाही.राजकारणात कुणाला उभे करायचे आणि कुणाला आडवे करायचे ही जबरदस्त किमया त्यांच्याकडे आहे.पवारांविरूद्ध बंड सोडाच वर तोंड करून पाहाणाऱ्यांची खैर नसते.पवारांचा ज्यांनी ज्यांनी म्हणून नाद केली ती नेतेमंडळी आज राजकीय विजनवासात आहेत.आपले पुतणे अजितदादा यांच्यासह दहाजणांनी बंड करून महायुतीच्या आश्रयाला गेले आणि त्यातील पाचजण लालदिव्यांची गाडी घेतली.जे जे सोडून गेले,ते ५ जण शरद पवारांच्या रडारवर असून पवारांनी येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा करेक्ट कार्यक्रम करण्याची रणनीती आखल्याचे वृत्त आहे.**



सोडून गेलेल्या लोकांच्या मतदारसंघात विशेष लक्ष देण्यास पवारांनी सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह २०२३ मध्ये सोडून गेलेल्या लोकांच्या विरोधात पवारांनी रणनिती आखण्या सुरुवात केली आहे. ज्या मंत्र्यांना कठीण काळात मदत केली, मार्गदर्शन केले त्यांच्या विरोधात उमेदवार देण्यासाठी शरद पवारांनी प्लॅन तयार केल्याचे सांगण्यात येते. मंत्री छगन भुजबळ, मंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री हसन मुश्रीफ, अर्थमंत्री अजित पवार, माजी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या विरोधात शरद पवारांनी शड्डू ठोकला आहे.

पवारांनी संबंधित मंत्र्यांच्या मतदारसंघात विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. दिग्गज नेत्यांना आव्हान देण्यासाठी त्यांच्या मतदारसंघात नवे चेहरे उभे केले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या प्रत्येक मतदारसंघात कोणता उमेदवार द्यायचा? याबाबत शरद पवारांचे विशेष लक्ष आहे. पुण्यात त्यांनी १२०० पेक्षा अधिक इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सोडून गेलेल्या लोकांविरुद्ध कडवी झुंज देण्यासाठी भाजपमधल्या अनेकांना पक्षात प्रवेश दिला जातोय. दत्तात्रय भरणे, धनंजय मुंडे ज्यांनी पक्ष फुटल्यानंतर अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याविरोधात शरद पवारांनी खास प्लॅन आखल्याने अजित पवारांच्या पक्षात खळबळ माजली आहे.

### मुश्रीफांविरोधात डाव

कागल विधानसभेतून हसन मुश्रीफ पाच वेळेस निवडून आले आहेत. त्यांच्याविरोधात लढण्यासाठी शरद पवारांनी समरजीत घाटगेंना भाजपमधून आयात केले आहे. घाटगे यांनी यापूर्वी मुश्रीफ यांच्या विरोधात निवडणूक लढवली आहे. परंतु मतांच्या विभाजनामुळे त्यांचा पराभव झाला होता.

### भरणे मामांना घेरले

इंदापूरमध्ये पवारांनी भाजपचे माजी नेते हर्षवर्धन पाटील यांना भरणे यांच्याविरोधात उमेदवारी देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या दत्तात्रय भरणे यांनी केवळ ३ हजार मतांनी हर्षवर्धन पाटलांचा पराभव केला होता. त्यातच लोकसभा निवडणुकीत इंदापुरातून सुप्रिया सुळेंना मोठा लीड मिळाल्याने हर्षवर्धन पाटलांना आत्मविश्वासही वाढला आहे.

### मुलीलाच मैदानात उतरवणार

गडचिरोलीच्या अहेरी मतदारसंघात मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांची कन्या भाग्यश्री आत्राम यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलाय. आत्राम यांच्याविरोधात त्यांच्याच कन्येला उभा करण्याचा शरद पवारांचा डाव आहे.

### वळसे पाटलांच्या मुसक्या आवळणार

मंचरचे आमदार असलेल्या दिलीप वळसे पाटील यांनाही लक्ष्य करण्याची पवारांची रणनीती आहे. यापूर्वी वळसे पाटील यांच्या विरोधात निवडणूक लढविलेल्या देवदत्त निकम यांच्या मागे थोरल्या पवारांनी आपली ताकद लावली आहे. मागील निवडणुकीनंतर नाराज झालेल्या काही लोकांनी देवदत्त निकम यांना पाठिंबा देण्यास सुरुवात केली आहे.

### छगन भुजबळांवरही डोळा

शरद पवारांनी नाशिकच्या येवल्यात छगन भुजबळ यांच्या विरोधात उमेदवार निश्चित केला नसला तरी त्यांनी तिथून लोकसभेच्या प्रचाराला सुरुवात केली होती. नुकत्याच त्यांनी काही स्थानिक नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन येवल्यात ताकद वाढवण्याचा प्रयत्न केलाय.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सध्या सोने म्हणजे आपटयाची पानेच आपल्या आवाक्यात आहेत!!!

| कल्याण |
|---|
| 269-74-158 |

| मुंबई |
|---|
| 339-58-233 |





युवा, प्रामाणिक, निर्व्यसनी, विचारशील आणि दूरदृष्टी असलेल्या नेत्यांना विधानसभेत पाठवून खऱ्या बदलाची सुरुवात घडवूया.

maargfoundation.online I santoshpawar.online I helpline #75077 43019 / 94203 16747 / 96574 00040
व्हाईट हाऊस, म्हाडा कॉलनी, हॉटेल सावन समोर, जुळे सोलापूर.
For More Follow Us On santosh_pawar_southsolapur I Santosh Pawar - संतोष पवार

आ.श्री. संतोष पवार साहेब
संस्थापक-अध्यक्ष-मार्ग फाऊंडेशन